# मी स्वप्न सत्यात उतरवू शकतो

## SESSION PLAN

**भाग १** - उत्साही बनवणारं - ऊर्जा देणारं (3 minutes)

**भाग २** - (8 minutes)

**भाग ३** - परिचय (2 minutes)

**भाग ४** - निक चा व्हिडीयो (15 minutes)

**भाग ५** - मी स्वप्न सत्यात उतरवू शकतो (8 minutes)

**भाग ६** - BRAIN TATTOOS (4 minutes)

---

## भाग १ - उत्साही बनवणारं - ऊर्जा देणारं (3 minutes)

### गोष्टं पूर्ण करा ...

शिक्षक आता गोष्टं सुरु करेल... तीन विधाने

१. दोन भाऊ होते

२. दोघे चोर होते

३. एका भावाचं गुपीत होते ज्याची त्याला लाज वाटायची

वर्ग आता गोष्टं पूर्ण करेल।

जे जे विद्यार्थी शांत बसलेले आहे, किंवा शेवटच्या बेंच वर बसलेले आहे, त्यांना पण गोष्टं पूर्ण करायला सहभागी करा। वर्गाच्या चारही कोपऱ्यातील मुलांना सहभागी करा। (९ भागाचा ग्रिड)

त्यांच्या सहभागाबद्दल पूर्ण वर्गाचं कौतुक करा आणि त्यांना सांगा कि हाच पुरावा आहे कि आपण ह्याचा पुढे खूप मजा करणार आहे।

---

# भाग २ - (8 minutes)

## उपक्रम - पाठीवर चित्र रेखाटणे.

१. संपूर्ण वर्ग एका ओळीत बसवा आणि बघा की २ विध्यार्थांच्या मध्ये मोकळी जागा नसावी।

२. तुमच्या संपूर्ण विध्यार्थांच्या समूहातील विद्यार्थी एका सरळ रेषेत फळ्याकडे बघतील असे बसवा.

३. प्रत्येक समूहातील विद्यार्थ्याला आपल्या समूहाला एक नाव ठरवायला सांगा। ते नाव कोणत्याही खाण्याच्या पदार्थाचे असावे।

४. प्रत्येक समूहातील सरळ रेषेतील शेवटचा विद्यार्थी शिक्षकांकडे जाईल। शिक्षक त्यांना एक चित्र काढण्यासाठी दाखवतील। सर्व समूहांना एकच चित्र एकाचवेळी दाखविले जाईल।

५. हे चित्र बघितल्या नंतर प्रत्येक जण आप आपल्या समूहात सर्वात शेवटी जाऊन बसेल।

६. जेव्हा खेळ / उपक्रम सुरु करायची सूचना होईल, तेव्हा शेवटच्या विध्यार्थाने पाहिलेले चित्र, त्याने स्वतःच्या बोटाने आपल्या पुढील मुलाच्या पाठीवर काढावे।

७. एकदा त्याचं चित्र काढून झालं, त्याच्या पुढील बसलेला विध्यार्थी, त्याच्या पुढील बसलेल्या विध्यार्थ्याच्या पाठीवर चित्र काढेल।

८. ही कृती शेवटच्या मुलापासून पहिल्या मुला पर्यंत करावी। जे त्याच्या पाठीवर काढले गेलेले चित्र त्याच्या लक्ष्यात आले ते त्याने कागदाच्या तुकड्यावर काढावे। त्याचं चित्र काढून झालं कि तो त्याचा हात वर करेल, पेन्सील खाली ठेवेल आणि इतर कुणी त्याचं चित्र पाहू नये म्हणून तो कागद उलटा ठेवेल।

## चर्चेसाठी कल्पना:

१. तुम्हाला कसं वाटलं, जेव्हा तुम्ही ती व्यक्ती होता, जीने प्रथम चित्र काढायला सुरुवात केली? तुम्हाला कसं वाटलं, जेव्हा तुम्ही समूहातील 'मध्य' व्यक्ती होता? तुम्हाला कसं वाटलं, जेव्हा तुम्ही ती व्यक्ती होता जीने कागदावर चित्र काढले?

२. हा उपक्रम आपल्याला संभाषणा विषयी काय सांगतो?

३. कशामुळे / कोणत्या प्रकारे एका गोष्टं वस्तुस्थिती बदलते?

---

---

## भाग ३ - परिचय (2 minutes)

माझं नाव __________ आहे। आमचा असा विश्वास आहे की या जगात कोणीच अनोळखी नाही पण आपण असे मित्र आहोत जे या आधी भेटले नव्ह्तो। मला तुमचा मित्र / मैत्रिण समजा।

आमचा असा विश्वास आहे की आयुष्यात काहीही घडले तरी आम्ही पुढे जात राहणार। काहीतरी अर्थपूर्ण काम करत राहणार आणि म्हणूनच आज मी आणि माझे सहकारी इथे आलोय। आम्ही इथे ७ सत्र घेणार आहोत। आपण खूप शिकणार आहोत आणि त्या बरोबर खूप मजा करणार आहोत।

---

## भाग ४ - निक चा व्हिडीयो (15 minutes)

(व्हिडीयो बघायला सर्वांना पुढे बोलवा २ मिंट + व्हिडीयो ३ मिंट + चर्चा ३ मिंट + तुमचं सारांश ७ मिंट)

व्हिडीयो मधील नैतिक धडा।

"जे स्वप्न बघतात, ते चुकांना सामोरं जाण्याचं ध्यैर्य बाळगतात।

**Dreams - स्वप्न**

**Belief - विश्वास**

**Failures - असफलता** - शिकण्याचे माध्यम... काही अपयशाचे उदाहरण दया। सुंदर न दिसणारं, कमी बुद्धी, खेळात चांगला नसणे, अभ्यासात हुशार नसणे, मित्र / मैत्रिण नसणे।

**Hard Work - मेहनत**

हे मिळून S.V.A.M. - SVAM! जेव्हा मी स्वप्न बघतो, मी आत्म विश्वासू असतो, मी असफलतेने डगमगत नाही, आणि मी कठोर परिश्रम करायला तयार आहे, तर मी कुठल्याही परिस्तिथी चा सामना करू शकतो आणि मग मी स्वप्न सत्यात उतरवू शकतो!

---

## भाग ५ - मी स्वप्न सत्यात उतरवू शकतो (8 minutes)

इतिहास अश्या अनेक गोष्टं सांगेल की जेव्हा 'तज्ञ' लोकांचा मते, दुसऱ्या लोकांच्या काही कल्पना, योजना आणि उपक्रम पूर्ण होणार नाहीत। पण वास्तवात... त्यांना हे साध्य करता आलं जे म्हटले / ज्यांना विश्वास होता - मी स्वप्न सत्यात उतरवू शकतो।

१. इटलीचा शिल्पकार अगस्तीनो द अंतोनियो याने संगमरवरी दगडातून एक शिल्प कोरण्यासाठी खूप मेहनत घेतली। पण त्याच्या मनातील 'सर्वोत्कृष्ट' कलाकृती तो नाही साकारु शकला। आणि खेद व्यक्त करून तो म्हणाला की या संगमरवरातून तो काहीही शिल्प निर्माण करू शकत नाही।

अनेक शिल्पकारांनी ह्या 'कठिण' संगमरवरातून शिल्प साकारण्याचा प्रयत्न केला पण तो अयशस्वी ठरला।

मायकल एंजेलो ने हा दगड शोधला आणि यातून काय आविष्कार घडूशकेल अश्या शक्यता त्याचा नजरे समोर आल्या आणि त्याच्या 'मी स्वप्न सत्यात उतरवू शकतो' ह्या दृष्टीकोनामुळे जगातील सर्व सर्वोत्कृष्ट कालाकृतीपैकी एक अशी कलाकृती / शिल्प - 'डेविड' निर्माण झाली। २. स्पेनच्या तज्ञांच मत होत की कोलंबसची ही जी योजना आहे, भारताकडे जाणारा नवा जवळचा मार्ग शोधून काढणे हे असंभव आहे। राणी Isabella आणि राजा Ferdinand यांनी तज्ञांच्या अहवालाकडे दुर्लक्ष केले। 'मी स्वप्न सत्यात उतरवू शकतो' ह्या दृष्टीकोनाचा कोलंबसने पाठपुरावा केला। आणि त्याने मार्ग शोधून काढला। सर्वांना माहित होत, मान्य होत कि हे जग सपाट आहे... कोलंबस शिवाय। नीना, पिंता, सैन्ता मारिया, कोलंबस आणि त्याचे अनुयायी समुद्रमार्गे अशक्यतेच्या नव्या भूमीकडे निघले... नवी भुमि... भरमसाट नैसर्गिक संपत्ती...

३. महान शास्त्रज्ञ थौमस अल्वा एडिसन यांनी त्यांच्या मित्र हेनरी फोर्ड यांस नाउमेद केलं त्याच्या, मोटरकार तयार करण्याच्या कल्पनेचा पाठपुरावा करण्यासाठी। एडिसनच्या मते हि कल्पना निरर्थक होती त्याने हेनरीला स्वतःकडे कामासाठी येण्यास सांगितले। पण हेनरी फोर्ड ने त्याच्या स्वप्नांचा अथकपणे पाठपुरावा केला। त्याची पहिली गाडी / कार तयार झाली ज्यात परतीचा गियर नव्हता। पण हेनरीला हे पक्क माहीत होतं - मी स्वप्न सत्यात उतरवू शकतो। आणि हो त्याने हे घडवून आणलं ही।

४. आपले मित्र और्विले आणि विल्बर राईट यांना विसरता कामा नये। पत्रकार, मित्र परिवार, युद्ध तज्ञ, अगदी त्यांचे वडील ही त्यांच्या 'विमान' बनविण्याच्या कल्पनेवर हसले होते। "किती मूर्खपणा आणि भ्रमिष्ट मार्ग आहे हा पैसे खर्च करण्याचा / उडविण्याचा! ते उपहासाने थट्टा करत म्हटले उडणं पक्ष्यांसाठी सोडा। राईट बांधुंनी प्रतिउत्तर दिलं... आम्ही स्वप्न पाहिलं आहे... आम्ही ते सत्यात उतरवू शकतो। We can make it happen. याचा परिणाम म्हणून उत्तर करोलिना मधील किटी हौक हे ठिकाण त्यांची हस्यास्पद कल्पना launch करण्यासाठी निवडण्यात आलं।

अपयशापुढे हार न मानता, नव्या जोमाने प्रयत्न करणं, त्याला सामोरं जाणं ही 'Rockstar' गुण आहे।

---

## भाग ६ - BRAIN TATTOOS (4 minutes)

Brain Tattoo ही संकल्पना स्पष्ट करा।

वर्गातील विध्यार्थ्यांना Brain Tattoo विचारा। किमान एक गोष्टं त्यांना लिहायला सांगा जी ते आज शिकले। ज्याने खूप उत्साहाने सहभाग घेतला त्याला वर्गामध्ये chart माहिती फलकावर लावायला सांगा। त्यांना superstar असल्याची जाणीव होवू दया।